# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन)

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य), एफ/उत्तर विभाग, 3 रा मजला, 96 भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई – 400 019

**क्र. सअ / एफ/उत्तर/3843/घ.क.व्य./ दिनांक- 23.06.2026**

## स्वारस्य अभिव्यक्ती

एफ/उत्तर विभागामध्ये महत्वाची ठिकाणे, महत्वाचे मार्ग व कायम वर्दळीची ठिकाणे तसेच रेल्वे स्थानकाच्या आजुबाजुच्या परिसरामध्ये दुस-या पाळीमध्ये स्वच्छतेची सेवा पुरविणेसाठी स्थानिक अशासकीय संस्थांची नेमणुक करण्याबाबतच्या कामाकरिता एकूण 90 दिवसांच्या कालावधीकरिता दुस-या पाळीमध्ये साफ सफाईच्या कामाकरिता इच्छुक अशासकीय संस्थांकडून उपायुक्त (परि-2) यांच्या मंजूरी अन्वये अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर कामाकरीता अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) एफ/उत्तर यांच्या कार्यालयात दि. 23.06.2026 ते 30.06.2026 (सकाळी 11.00 वाजेपर्यंत) रु. 3993/-+18% जीएसटी कर असे एकूण रु. 4712/-इतक्या रक्कमेचे चलन भरल्यानंतर मिळतील. सदरचे अर्ज संस्थेने विभाग कार्यालयात देण्याचा अंतिम दिनांक 30.06.2026 दुपारी 4.00 वाजेपर्यंत आहे. या वेळे नंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

सदर कामाकरीता अर्ज करणा-या संस्थेने दि. 31.10.2025 पर्यंत केलेल्या कामाचे भविष्य निर्वाह निधी व कामगार विमा योजनेचे अधिदान भरणा केलेली कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सही/-23.06.2026

**सहाय्यक अभियंता (घकव्य) एफ/उत्तर**